सत्यमेव जयते

# आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

## महाराष्ट्र राज्य पुणे

२८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ, पुणे-४११००१

दुरध्वनी- ०२०-२६३६२७७२
फॅक्स ०२०-२६३६ ००२६
emailtrti.mah@nic.in
Website-
trti.maharashtra.gov.in

---

आस्था – २०२०/मु.व.स.क.मु. /का.१ /3033 दिनांक:११/११/२०२१

## जाहिरातीचा नमुना

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**
**आदिवासी विकास विभाग**
**महाराष्ट्र शासन**

**क्वेस्ट कार्यालय, मुंबई या ठिकाणी कार्यकारी संचालक पद-१ भरती करणेबाबत.**

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे ही मुंबई विश्वस्त अधिनियम १९५० नुसार नोंदणीकृत स्वायत्त संस्था आहे. आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासींच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, पोषण, कौशल्य विकास व वनहक्क बाबत विविध योजना व प्रकल्प राबविले जातात. सदर योजना व प्रकल्पांच्या अंमलबजावणी, मूल्यमापन व संनियंत्रण करीता केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत प्राप्त निधीतून क्वेस्ट कार्यालयाची स्थापना मुंबई येथे करण्यात आली आहे.

क्वेस्ट मुंबई कार्यालयासाठी कार्यकारी संचालक (पद-१) मानधन तत्वावर ११ महिने करार कालावधीकरीता नियुक्त करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार अर्हताप्राप्त इच्छुक उमेदवारांकडून विहीत नमुन्यातील अर्ज येत आहे. सदर अर्ज भरण्याची तारिख दि.१५.११.२०२१ ते २५.११.२०२१ पर्यंत असेल. याबाबत सविस्तर माहिती कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ trti.maharashtra.gov.in ला भेट द्यावी. सदर पदाकरीता पात्रताधारक उमेदवारांची निवड करण्याचे अधिकार सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांचेकडे राहतील.

**(डॉ.राजेंद्र भारूड भा.प्र.से.)**
**आयुक्त**

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे-१